<u>प्रेसनोट दि. १६/०४/२०१९</u>

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर गुन्हा रजि.नं. ३११ /२०१९, मुंबई प्रोव्ही. अधिनियम चे कलम ६५(ड) मधील अटक आरोपी नामे सोपान मधुकर देवकर यांचा उपचारा दरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने ससुन हॉस्पीटल मृत्यु झाले बाबत.**

---

दि. १०/०४/२०१९ रोजी नऱ्हे पोलीस चौकी चे हददीत जे.एस.पी.एम. कॉलेजच्या पाठीमागील मोकळया जागेत इसम नामे सोपान मधुकर देवकर रा.मधुरा आंगन सोसायटी, फ्लॅट नं. १४, मारुती मंदिरा शेजारी, आंबेगाव खुर्द, पुणे हे बेकायदेशीर रित्या विनापरवाना गावठी हातभट्टी दारुची विक्री करीत आहेत. अशी माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी नऱ्हे चौकी येथील अधिकारी/कर्मचारी यांनी रेड करुन त्याचे ताब्यातुन प्लॅस्टिकच्या कॅन मध्ये एकूण ५ लिटर भरलेली गावठी हातभटटीची दारू हस्तगत करुन मुंबई प्रोव्हिबिशन ॲक्ट कलम ६५ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

दाखल गुन्हयातील आरोपी नामे सोपान मधुकर देवकर, वय ६० वर्षे, धंदा-शेती, रा. मधुरा आंगन सोसायटी, फ्लॅट नं. १४, मारुती मंदिरा शेजारी, आंबेगाव खुर्द, पुणे यास दाखल गुन्हयात दि.१०/०४/२०१९ रोजी सायंकाळी १९.३० वा. अटक करुन त्यास अटक केलेबाबत त्याचा मुलगा नामे आदेश सोपान देवकर, वय २३ वर्षे, धंदा-रिक्षा चालक, रा. सदर यास समक्ष कळवीलेले आहे. त्यानंतर नमुद आरोपीची ससुन हॉस्पीटल, पुणे येथे वैद्यकीय तपासणी करुन त्यास सुरक्षेकामी विश्रामबाग लॉकअप मध्ये ठेवण्यात आले होते.

दि. ११/०४/२०१९ रोजी सकाळी ०७.४५ वा. चे सुमारास यातील आरोपी नामे सोपान मधुकर देवकर यास फिट आल्याने त्यास ०८.२० वा. चे सुमारास ससुन हॉस्पीटल पुणे येथे औषधोपचारकामी नेले असता ससुन हॉस्पीटल येथील वैदयकीय अधिकारी यांनी त्यास तपासुन आय.सी.यु. वॉर्डमध्ये ॲडमीट केले होते व दि. ११/०४/२०१९ रोजी २०.०० वा. चे सुमारास आरोपी नामे सोपान मधुकर देवकर याची प्रकृती नॉर्मल झाल्याने त्यास ससुन हॉस्पीटल येथील डॉक्टरांनी आय.सी.यु. वॉर्डमधुन जनरल वॉर्ड नं. १८ मध्ये ॲडमीट करुन त्याचेवर औषधोपचार चालु ठेवले होते. सदर बाबत आरोपी याचे नातेवाईकांना कळविण्यात आले होते. नमुद आरोपी याचेवर औषधोपचार चालु असलेबाबत दि. ११/०४/२०१९ रोजी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. ए.सी.कोर्ट, शिवाजीनगर, पुणे यांना सविस्तर अहवाल सादर करण्यात आला होता. सदर आरोपी याचेवर उपचार करण्यात येत असतांना डॉक्टरांनी Acclerated Hypertention with Alcoholic Withdrawl या आजारावर औषधोपचार चालु असल्याबाबतचे लेखी कळविले होते. तद्नंतर दि. १४/०४/२०१९ रोजी आरोपी नामे सोपान मधुकर देवकर याचेवर ससुन जनरल हॉस्पीटल जनरल वॉर्ड नं. १८ मध्ये उपचार चालु असताना दुपारी १६.०० वा. चे सुमारास आरोपी सोपान मधुकर देवकर यास हृदयविकाराचा तिव्र झटका आल्याने त्यास तातडीने आय.सी.यु. वॉर्डात डॉक्टरांनी ॲडमीट करुन उपचार सुरु ठेवले होते. सदर उपचार सुरु असतांना डॉक्टारांनी आरोपीची प्रकृती ही अतिशय चिंताजनक असुन त्यांना हृदयविकाराचा झटका आले बाबत नमुद केले होते. नमुद आरोपी नामे सोपान मधुकर देवकर याचेवर आय.सी.यु. वॉर्डात औषधोपचार चालु असताना तो रात्रौ २३.४५ वा. मयत झाल्याचे त्याचेवर उपचार करणारे डॉक्टरांनी घोषीत केले आहे. सदर बाबत मयत आरोपी यांचे नातेवाईकांची काही एक तक्रार नाही.

मयत इसम नामे सोपान मधुकर देवकर याचेवर ०३ वैदयकीय अधिकारी यांचे पॅनलने इन कॅमेरा पोस्टमार्टेम केलेले असुन त्यामध्ये मयतास Death due to coronary artery disease या कारणाने मृत्यु आला असलेबाबत स्पष्ट अभिप्राय दिलेला आहे. सदर प्रकरणाचा तपास हा निपक्षपातीपणे व्हावा तसेच नियमाप्रमाणे Death in custody चा तपास हा राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडुन करण्यात येत असल्याने बंडगार्डन पोलीस स्टेशन येथ अकस्मात मृत्यु क्र ६३/२०१९ प्रमाणे नोंद करण्यात आलेली असुन पुढील तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे पथक करीत आहे.

**पुणे**
**दिनांक १५/०४/२०१९**

**वरीष्ठ पोलीस निरीक्षक**
**सिंहगड रोड पो स्टे पुणे शहर**